महत्वाचे

जा.क्र.उमाशि-२/११ वी ऑनलाईनप्रवेश/पुवि/२०१४
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : २३/५/२०१४

23 MAY 2014

प्रति

सर्व मूख्याध्यापक
माध्यमिक शाळा
पुणे व पिंपरी चिंचवड शहर परिसर, पुणे

विषय :- अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१४-१५ मधील कला प्रमाणपत्र प्रमाणित करण्याबाबत व आरक्षणाबाबत

संदर्भ :- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन परिपत्रक क्रं. प्रवेश-२०१४/ प्र.क्र.८१/एसडी-२ दिनांक २३ मे २०१४

पुणे व पिंपरी महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता ११ वी चे शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील प्रवेश ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहेत. त्यादृष्टीने विद्यार्थ्यांना इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यासाठी वेबसाईट उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. प्रवेश अर्जाचा भाग १ पूर्ण झालेला असून त्यापैकी काही विद्यार्थ्यांनी पार्ट १ चा भाग मूख्याध्यापकांनी (सामाजिक व विशेष आरक्षणाच्या बाबतीत) अप्रूव्हल करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

कलेच्या क्षेत्रातील इयत्ता अकरावीतील प्रवेश मिळण्यासाठी राखीव ठेवलेल्या २ % जागांकरीता प्रमाणपत्र प्रमाणित करुन देण्याबाबत शासनाने संदर्भीय शासन निर्णयान्वये शासनमान्य संस्थेकडून संगीत, नृत्य व नाटय क्षेत्रात प्राविण्य प्रमाणपत्र मिळविलेले विद्यार्थी / सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित राज्य नाटय/बालनाटय/व्यावसायिक नाटय स्पर्धेत अभिनयाचे पारितोषिक मिळविलेले विद्यार्थी/राज्य/केंद्र अथवा आंतरराष्ट्रीय स्तरावर चित्रपट पुरस्कार मिळविलेले विद्यार्थी यांच्या प्रमाणीत यादयांची सॉफ्ट कॉपी पाठविली आहे. सदर यादीप्रमाणे कलेच्या क्षेत्रातील इयत्ता अकरावीतील प्रवेश मिळण्यासाठी राखीव ठेवलेल्या जागांकरीता प्रमाणपत्र प्रमाणित करुन घेण्याची आवश्यकता नसल्याचे कळविले आहे. आता मूख्याध्यापकांनीच संबंधित विद्यार्थ्यांचे यादीत नांव समाविष्ठ असल्यास त्यांचेकडील प्रमाणपत्र पाहून आपल्याकडील लॉगीन आयडी पासवर्ड नुसार विद्यार्थ्यांचा ऑनलाईन प्रवेश अर्जाचे अप्रूव्हल करावयाचे आहे. शासन निर्णय व विद्यार्थ्यांच्या यादया **http://pune.fyjc.org.in** व **www.dydepune.com** या संकेतस्थळावर ठेवलेल्या आहेत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या **www.dydepune.com** संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १